# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

## प्रेसनोट

- **सलग सातव्या दिवशी मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात मा. आयुक्त यांच्या निर्देशानुसार अतिक्रमण विभागामार्फत एकूण २७ अनधिकृत गुटखा विक्रेते स्टॉलवर कारवाई**

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सलग सातव्या दिवशी अनधिकृत बांधकाम व अनधिकृत पान टपऱ्या, स्टॉल, फेरीवाले यांच्यावर कारवाई करण्यात आली. दिनांक ०४ जुलै २०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार शाळा, कॉलेज, मंदिर यांच्यापासून शंभर मीटर परिसरामध्ये जे स्टॉलधारक सिगारेट, तंबाखू, गुटखा याची विक्री करतात अशा एकूण २७ स्टॉल धारकांवर महापालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत धडक कारवाई करण्यात आली. मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी विविध प्रभागातील अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त करणेकामी निर्देशित करण्याच्या सूचना दिल्या आहे. त्या निर्देशानुसार प्रभागातील अनधिकृत बांधकामे, अनधिकृत सीसीटीव्ही यंत्रणा स्मार्टपोल, फेरीवाले, गॅरेजेस, पदपथावरील व्यावसायिक, अनधिकृत हॉटेल/बार, अनधिकृत होर्डिंग्ज, अनधिकृत झोपड्या यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे.

मा. आयुक्त यांच्या सुचनांनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका अतिक्रमण विभागाने महापालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामे, अनधिकृत स्टॉलधारक यांच्यावर कठोर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. मिरा भाईंदर वसई विरार पोलीस प्रशासनाने मिरा भाईंदर महानगरपालिकेस पत्रव्यवहार केल्यानंतर गुटखा बंदी या कायद्याअंतर्गत महापालिका व पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने ही धडक कारवाई करण्यात आली. प्रभाग समिती क्रमांक ०१ मध्ये ०१ टपरी, प्रभाग समिती क्रमांक ०२ मध्ये ०९ टपऱ्या, प्रभाग समिती क्रमांक ०३ मध्ये ०२ टपऱ्या, प्रभाग समिती क्रमांक ०४ मध्ये ०६ टपऱ्या, प्रभाग समिती क्रमांक ०५ मध्ये ०३ टपऱ्या, प्रभाग समिती क्रमांक ०६ मध्ये ०६ टपऱ्या एक अश्या एकूण २७ टपऱ्यांवर महापालिकेमार्फत कारवाई करण्यात आली आहे. सदर कारवाई प्रसंगी अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे, उपायुक्त (अतिक्रमण) रवि पवार, पोलीस उपायुक्त प्रकाश गायकवाड, सहाय्यक आयुक्त, कनिष्ठ अभियंता, फेरीवाला पथकप्रमुख व कर्मचारी उपस्थित होते.